वाचा : १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम २३४.
२.मा.उच्च न्यायालय जनहित याचिका क्र.१७३/२०१० मधील निर्देश.
३.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/ नवि ३४ दि. ६ जुलै, २०१५.
४.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.याचिका २०१५/सं.क्र.८७८(२)/ नवि ३४ दि. ६ जुलै, २०१५. ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००.
५.मा.महासभा ठराव क्र.६९३ दि.१७/१०/२०१५.
६.महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन पत्र क्र. डीआयएस ०६१६/ प्र. क्र. १७७/ विशा १ ब दि. १०.०८.२०१६.

---

नाशिक महानगरपालिका, नाशिक.
जा.क्र.म.का.मिवप/कक्ष-१/२४२२/२०१८
दि. ०४/०८/२०१८

## <u>परिपत्रक</u>

विषय :•गणेशोत्सवाकरीता सार्वजनिक ठिकाणी तात्पुरता मंडप, स्टेज,कमान उभारण्यास परवानगी देणेबाबत...

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव मंडप उभारण्यासाठी विविध सार्वजनिक मंडळे महानगरपालिकेकडे अर्ज करतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-२३४ अन्वये पोलिस आयुक्त यांच्या सहमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका परवानगी देऊ शकतात. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.१७३/२०१० मधील निर्देश, त्यासंबंधी शासन मार्गदर्शक तत्वे आणि ध्वनी प्रदूषण अधिनियम यांचे पालन होण्याच्या दृष्ट्रीने अडथळामुक्त मंडप उभारणी करणे, सुरळीत वाहतूकीची दक्षता घेणे, तसेच ध्वनी प्रदूषण टाळण्याबाबत उपाययोजना करणे याबाबींची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या बरोबरच अर्जदारांना मंडप उभारण्याची परवानगी विहीत मुदतीत मिळणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मंडप परवानगीसाठी पुढीलप्रमाणे महत्वाच्या बाबी विषद करण्यात येत आहेत.

१. नाशिक महानगरपालिकेतर्फे सुलभ परवानगी प्रक्रियेसाठी 'संयुक्त एक खिडकी संकल्पना' राबविण्यात येईल.
२. मंडप परवानगीसाठी सार्वजनिक मंडळांना महापालिकेच्या विभागीय कार्यालयांतील एक खिडकी कक्षामध्ये किंवा ऑनलाईन अर्ज करता येईल.
३. सार्वजनिक गणेशोत्सव, २०१८ हा पर्यावरणपूरक साजरा करणेत येईल. त्यादृष्टीने ध्वनीवर्धकाच्या वापरावा मर्यादा, नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी विसर्जनस्थळी निर्माल्य कलश, कृत्रिम तलावांमध्ये श्री गणेशमूर्ती विसर्जनाची सोय, सजावटीसाठी थर्मोकोल ऐवजी इकोफ्रेंडली साहित्याचा वापर, प्लास्टर ऑफ पॅरीस ऐवजी शाडु मातीच्या मूर्ती आणि सार्वजनिक मंडळांच्या प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मोठया मूर्तीऐवजी छोटया मूर्तीचे विसर्जन याबाबींची दक्षता घेणेत यावी.

४. नाशिक मनपाची सर्व विभागीय कार्यालये, शहर वाहतूक शाखा, पोलीस विभाग व अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागांच्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी/शर्तीचे पालन करणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळावर बंधनकारक राहील.
५. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांन्वये मंडप उभारणी करणेकरीता रस्त्यांवर खड्डे न होण्याची दक्षता घेणे आवश्यक आहेत तसेच मंडप व कमानी उभारणी करतांना खांब रोवण्यासाठी वाळूच्या ड्रमचा वापर करावा. मंडपापासून १५ मीटरपर्यंत विदयुत रोषणाई करता येईल.
६. वाणिज्य स्वरुपाच्या जाहिरातीस कर लागू आहे.
७. दुर्घटना घडू नये, यासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी लागेल. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विद्युत विषयक कामे करुन घेण्यात यावीत.
८. विद्यार्थी, ज्येष्ठ अथवा आजारी व्यक्तींना ध्वनीक्षेपक यंत्रणेचा त्रास न होण्याची दक्षता घ्यावी.
९. श्री गणेशमूर्ती, मंडप व नागरीकांच्या सुरक्षेसाठी स्वयंसेवक व गर्दीचे नियोजनात मंडळांचा सहभाग असणे आवश्यक आहे.
१०.आवश्यक सर्व ना-हरकत दाखले, मंडप परवानगी तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे बंधनकारक आहे.

**<u>सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगीची सविस्तर कार्यप्रणाली पुढिलप्रमाणे राहील</u> •**

**<u>I) अर्ज सादर करणे :</u> •**

१. गणेशोत्सव# मंडप# परवानगी# अर्ज# स्विकारण्याच्या कालावधीबाबत# महापालिकेकडून# स्थानिक वर्तमानपत्रात# जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. तदनंतर मंडप परवानगीसाठी अर्ज दाखल करता येतील.
२. मंडप उभारणी परवानगीसाठी विहीत नमुन्यात अथवा महापालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे.
३. उत्सव सुरु होण्याच्या दिनांकाच्या १० दिवस अगोदर पर्यत परवानगी देण्यात येईल.

**<u>II) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :</u>•**

१. मंडपाचा स्थळ दर्शक नकाशा.
२. धर्मादाय उपायुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र.
३. पोलीस विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र.
४. वाहतूक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र.
५. अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
६. सार्वजनिक मंडळाचे नाव व पत्ता आणि पदाधिकारी, सदस्यांची यादी व दूरध्वनी संपर्क क्रमांक.

**<u>III) परवानगीची कार्यवाही :</u>•**

१. विभागीय अधिकाऱ्यांमार्फत अर्जाची छाननी करण्यात येईल.
२. छाननीअंती नाकारलेल्या अर्जांची कारणे अर्जदारास ऑनलाईन कळविण्यात येतील.

३. पोलीस,शहर वाहतूक व अग्निशमन विभागाने मंडळाकडून अर्ज मिळालेनंतर ५ दिवसांच्या आत ना-हरकत प्रमाणपत्र देणेचे आहे.
४. ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, स्थळदर्शक नकाशात दर्शविल्यानुसार मनपा विभागीय कार्यालयातील उपअभियंता यांनी ३ दिवसात जागेची पाहणी करुन अहवाल सादर करावयाचा आहे.
५. मंडपामुळे वाहतूक सुरळीत राहील व नागरिकांना अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत संबंधित उपअभियंता आपले अभिप्राय नोंदवून जागेचे रेखांकन करतील. तसेच जीपीआरएसद्वारे स्थळदर्शक फोटो अपलोड करतील.
६. सदरची कार्यवाही पूर्ण होताच, अर्जदारास मेसेज व मेलव्दारे कळविण्यात येईल.
७. तद्नंतर अर्जदाराने पेमेंट करून, विभागीय कार्यालयात पावती सादर करावी अथवा ऑनलाईन अपलोड करावी.
८. उपरोक्त पूर्तता झाल्यावर संबधीत विभागीय अधिकारी ३ दिवसात परवानगी पत्र ऑनलाईन अपलोड करतील.

**<u>IV) तात्पुरत्या 'मंडप' परवानगीकरीता सर्वसाधारण निकष :</u>•**

१. मंडप उभारणीमुळे वाहतूक सुरळीत राहील व नागरिकांना येण्या-जाण्यासाठी अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.
२. रेल्वेस्थानक, बसस्थानक, मुख्य ऑटो रिक्षा स्टँड, प्रमुख हॉस्पिटल्स व शैक्षणिक संस्था अशा गर्दीच्या व वर्दळीच्या ठिकाणी मंडप उभारण्यास परवानगी दिली जाणार नाही.
३. मंडप टाकण्याची परवानगी म्हणजे रस्ता खोदण्याची परवानगी नाही. तसे शक्य नसल्यास, रस्ता खोदण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-२४० अन्वये विहीत शुल्क भरुन विभागीय अधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घ्यावी. तसेच मंडप हटविल्यानंतर रस्ता पूर्ववत करावा. विनापरवानगी खड्डा खोदल्यास, नियमानुसार दंड आकारण्यात येईल.
४. मागील वर्षी ज्या आकाराचे मंडप/स्टेज उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती. तेवढयाच आकाराचा किंवा रस्त्याच्या १/४ भाग, यापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप/स्टेज उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. मंडप/स्टेज उभारणेकरीता आकारमानाचा तक्ता खालीलप्रमाणे -

| रस्त्याची रुंदी | मंडपाची कमाल रुंदी | खुल्या ठेवावयाच्या रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फूट | ६.२५ फूट | १८.७५ फूट |
| ५० फूट | १२.५० फूट | ३७.५० फूट |
| ७० फूट | १७.५० फूट | ५२.५० फूट |

५. ज्याठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत, अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील रुंदीच्या (फुटपाथ वगळून) १/४ पेक्षा जास्त रुंदी मंडपाची उभारणी करता येणार नाही.

६. वाहने वळविणे शक्य होण्यासाठी रोड जंक्शनपासून रस्त्याच्या रुंदीच्या १/४ अंतरावर मंडप राहील, अशा पध्दतीने जागा निश्चित करणेत येईल.

**V) तात्पुरत्या स्वरुपात 'कमान' उभारण्याचे निकष :** •

१. प्रत्येक मंडळास मंडपाच्या आवारात २ कमानींची परवानगी देता येईल.

२. वाहतुकीस व नागरिकांना येण्याजाण्यास अडथळा होईल, अशा रितीने कमान उभारता येणार नाही.

३. कमानीची उंची कमीत कमी २२ फूट असावी.

४. कमान टाकण्याची परवानगी, म्हणजे रस्ता खोदण्याची परवानगी नाही.

५. वाळूच्या ड्रममध्ये लाकडी बांबू टाकून कमान उभारता येईल. तसे शक्य नसल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-२४० अन्वये, विहीत शुल्क भरुन विभागीय अधिकारी यांचेकडून स्वतंत्र परवानगी घ्यावी. तसेच कमान हटविल्यावर रस्ता पूर्ववत करावा. विनापरवानगी खड्डा खोदल्यास नियमानुसार दंड भरणे बंधनकारक राहील.

६. कमानीवर व मंडप आवारात तात्पुरत्या स्वरुपात वाणिज्य जाहिरात करावयाची असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-२४५ अन्वये, विहीत शुल्क भरुन विभागीय अधिकारी यांचेकडून वेगळी परवानगी घ्यावी.

**VI) ध्वनी प्रदूषणाचे निकष :**•

१. लाऊडस्पिकरसाठी पोलीस विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक राहील.

२. शांतता क्षेत्र (सायलेंस झोन) म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधीकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेले इतर कोणतीही क्षेत्र यांच्या सभोवतालच्या १०० मीटर पर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.

३. ध्वनीमर्यादा खालीलप्रमाणे असेल-

| अ.क्र. | क्षेत्र | डेसीबल मधील मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत | रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत |
| १ | औदयोगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| २ | वाणिज्य क्षेत्र | ६५ | ५५ |
| ३ | रहिवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ४ | सायलेंस झोन | ५० | ४० |

**VII) शुल्क आकारणी :**•

१. मंडप उभारणीसाठी रु.७५०/- शुल्क निश्चीत करण्यात आले आहे.

२. एका कमानीसाठी रु.७५०/- शुल्क आकारण्यात येईल.

३. याव्यतिरिक्त वस्तू व सेवाकराची रक्कम वेगळी आकारण्यात येईल.

४. अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्रासाठी महानगरपालिकेने निश्चित केलेले दर आकारण्यात येतील.

५. महापालिका ठराव क्र.२९० दि.२४.०७.२०००, तसेच नगरविकास विभागाकडील शा.नि.क्र. एनएमसी३०२०/१८०८/प्र.क्र.१३०/२००० नवि-२५ दि.१० ऑक्टोबर २०००, तसेच स्थायी

समिती ठराव क्र.८९६ दि.०१.११.१९९९ अन्वये वाणिज्य जाहिरातीचे दर आकारण्यात येतील.

**VIII) तक्रार निवारण :•**

१. नागरिकांना खालील टोल फ्री क्रमांकावर विना परवानगी मंडप व ध्वनी प्रदूषणाची तक्रार नोंदविता येईल.

| अ.क्र. | विभागाचे नांव | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | मुख्यालय तक्रार निवारण केंद्र | १८००२३३१९८२<br>(टोल फ्री क्रमांक) |
| २ | नाशिक पूर्व | ०२५३- २५०४२३३ |
| ३ | नाशिक पश्चिम | ०२५३-२५७०४९३ |
| ४ | पंचवटी | ०२५३-२५१३४९० |
| ५ | नविन नाशिक (सिडको) | ०२५३-२३९२०१० |
| ६ | सातपूर | ०२५३-२३५०३६७ |
| ७ | नाशिकरोड | ०२५३-२४६०२३४ |
| ८ | ई-मेल आयडी | nashikcorporation@nashikcorporation.in |

२. ध्वनी प्रदूषण व विनापरवानगी मंडप/स्टेज तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वंतत्र नोंदवही ठेवण्यात येईल. प्राप्त झालेली तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित विभागीय अधिकारी, पोलिस स्टेशन व पोलिस कंट्रोल रुमला अग्रेषित करण्यात येईल.

३. पोलीस विभागामार्फत ध्वनी प्रदूषण नियम २००० नुसार उचित कारवाई करण्यात येईल.

४. विभागीय कार्यालयातील अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत मंडप तातडीने हटविण्यात येईल.

**IX) सर्वसाधारण अटी :•**

१. परवानगीचा अर्ज दाखल केला, याचा अर्थ परवानगी मिळाली असे नव्हे. मंडळाने लेखी परवानगी मिळाल्यानंतरच मंडप उभारणीचे काम सुरु करावे.

२. परवानगी मिळाल्यानंतर परवानगीचे पत्र मंडपाच्या दर्शनी भागावर किमान दोन ठिकाणी प्रदर्शित करावे.

३. मंडपाच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण महामंडळाकडून नियमानुसार विदयुत जोडणी घेण्यात यावी. विदयुत पुरवठा घेतेवेळी वायरिंगमध्ये जोड खुला राहणार नाही, या करीता सर्व विदयुत कामे परवानाधारक ठेकेदारामार्फत योग्य प्रकारे करावीत.

४. आग प्रतिबंधक साधने व प्रथमोपचाराची साधने तात्काळ उपलब्ध होतील अशा प्रकारे ठेवावीत.

५. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या २ टाक्या भरुन ठेवणे गरजेचे आहे.

६. मंडपातील आरास बंद स्वरुपाची असल्यास, नागरिकांना अत्यावश्यक वेळी बाहेर जाण्यासाठी सुटसुटीत मोकळा मार्ग ठेवण्यात यावा.
७. मंडप उभारतांना अग्निशमन दलाची वाहने अत्यावश्यक घटनेच्या वेळी मंडपाजवळ जाऊ शकतील, अशा प्रकारे मोकळी जागा ठेवण्यात यावी.
८. मंडपातून निघालेला ओला व सुका कचरा वर्गीकरण करुन, तसेच बंद डब्यात निर्माल्य ठेवून त्याची विल्हेवाट लावण्याची आणि उत्सव मंडप व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सार्वजनिक मंडळाची राहील.
९. मंडपापासून विदयुत तार व डी पी बॉक्स ६ फूट अंतरावर ठेवणे मंडळावर बंधनकारक आहे. तसेच विदयुत रोषणाई मंडपापासून जास्तीत जास्त १५ मिटर अंतरापर्यंत करता येईल.
१०. मंडपाच्या प्रवेशद्वारावर महानगरपालिकेने दिलेले परवानगी व अग्निशमन विभागाकडील परवानगी पत्र प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.
११. कोणाच्याही जातीय/धार्मिक भावना दुखावल्या जाऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे बॅनर,देखावे किंवा फलक मंडपामध्ये लावू नयेत.
१२. परवानगीधारकांनी त्यांना निश्चित करुन दिलेल्या आकारमानाचा मंडप उभारणे बंधनकारक राहील.
१३. ध्वनीप्रदूषण विषयक कोणत्याही बाबींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. उत्सव कालावधीत ध्वनी प्रदूषणाच्या विहीत मर्यादा पातळीच्या निकषांची अंमलबजावणी करावयाची आहे. तसेच यासंदर्भात पोलीस विभागामार्फत ठरवून दिलेल्या वेळेचे बंधन पाळण्याची दक्षता घ्यावयाची आहे.
१४. उत्सव संपल्यानंतर परवानगी अर्जामध्ये नमूद केलेल्या तारखेपर्यंत मंडप काढून घ्यावा.
१५. मा. उच्च न्यायालयाने महसूल विभागातील अधिकाऱ्यांना उत्सवाच्या १० दिवस अगोदर मंडप तपासणी करण्यास आदेश दिलेले आहेत. त्यामुळे मंडपाचे काम सुरु असतांना मंडपाच्या ठिकाणी जबाबदार व्यक्ती माहिती देण्यासाठी ठेवण्यात यावा. सदर अधिकारी मंडप तपासणीसाठी येतील, त्यावेळेस मंडळाच्या जबाबदार व्यक्तीने अधिका-यांस परवानगी दाखवावी व विचारलेली माहिती देण्यात यावी.

**<u>X) शास्ती :</u>**•

१. महानगरपालिकेची परवानगी मिळण्यापूर्वी टाकण्यात येणारे मंडप/कमान हे विनापरवानगी समजण्यात येतील. मंडप टाकणे हे विकास कामात अंतर्भूत होत असल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५४ अन्वये नोटीस देवून हटविण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच संबधितांविरुध्द सदर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल.
२. विनापरवानगी जाहिरात लावल्यास, सदरची जाहिरात काढण्यात येईल. तसेच विनापरवानगी जाहिरात लावल्याबददल, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.

३. मंडप/कमानी उभारतेवेळी विना परवानगी रस्त्याची खोदाई केल्यास, नियमानुसार दंड भरणे बंधनकारक राहील.
४. महानगरपालिकेच्या विदयुत पोलवरुन विदयुत जोडणी घेतल्यास, अर्जदार/मंडळाचे पदाधिकाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

वरील अटी/शर्ती तसेच मा.उच्च न्यायालय व शासनाच्या मार्गदर्शन सूचना तथा अटी/शर्तीचा भंग केल्यास देण्यात आलेली परवानगी रदद करून, अशा मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदरचे परीपत्रक नागरीक व सार्वजनिक मंडळे यांना माहितीकरीता मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

Sd/-
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

प्रति : •
१. अतिरिक्त आयुक्त ( शहर ), मनपा.
२. सर्व विभाग प्रमुख, मनपा.
३. सर्व विभागीय अधिकारी, मनपा.
४. सर्व सार्वजनिक मंडळे / नागरीक /संस्था इ.

प्रत : • माहिती व आवश्यक ती कार्यवाहीसाठी-
१. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा. पोलिस आयुक्त, नाशिक शहर.
३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
४. महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लि., नाशिक शहर.